Dombivli Shikshan Prasarak Mandal's
Pendharkar College of Arts, Science, and Commerce (Auton
Reaccredited with 'A' Grade (3.14 CGPA) by NAAC (3rd Cycle 2017)

जा. क्र.: के.वि.पी.सी./२०२४–२०२५/१९ दि. १०/०७/२०२४

## डोंबिवली शिक्षण प्रसारक मंडळाचे

## के. वि. पेंढरकर महाविद्यालय, डोंबिवली (स्वायत्त)

## दिव्यांगजन विदयार्थ्यासाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती (NSP Portal) योजना विषयक नोटिस २०२४–२५

**दिव्यांगजन प्रवर्गामधील** शिष्यवृत्तीस पात्र विदयार्थ्यांना कळविण्यात येते कि, सन २०२२–२०२३ मध्ये सदर शिष्यवृत्ती योजनेकरिता नवीन मंजूरीने (Fresh) आणि नुतनीकरणाने (Renewal) अर्ज ऑनलाईन (Online) पध्दतीने एनएसपी पोर्टलवरून मागविण्यात येत आहेत. ऑफलाईन (Offline) पध्दतीने भरलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. नवीन मंजूरीसाठी केंद्रशासनाकडून गुणवत्ता यादी (Merit List) तयार करण्यात येते. विदयार्थ्यांना मंजूर झालेल्या शिष्यवृत्तीची रक्कम केंद्रशासनामार्फत थेट विदयार्थ्यांच्या बँक खात्यात (Under DBT Mode) जमा करण्यात येते.

सदर शिष्यवृत्ती ११ वी, १२ वी, सर्टीफिकेट पदवी, पदव्यूत्तर डिग्री या अभ्यासक्रमासाठी देण्यात येते. सदर शिष्यवृत्तीसाठी इयत्ता १० वी, १२ वी ची परीक्षा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून तसेच पदवी व पदव्युत्तर परीक्षा मान्यताप्राप्त विदयापीठातून उत्तीर्ण झालेले विदयार्थी अर्ज भरण्यासाठी पात्र आहेत.

नवीन मंजूरी आणि महाराष्ट्र नूतनीकरणासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती –

१. दिव्यांगजन विदयार्थ्यासाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेच्या मार्गदर्शक तत्वानूसार पात्र व इच्छुक विदयार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नुतनीकरणासाठी www.scholarships.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे.

**२. विदयार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत दि. ३१.१०.२०२४ ही आहे.**

३. ज्या विदयार्थ्याकडे आधार क्रमांक आहे अशा विदयार्थ्यांचा आधार क्रमांक या पर्यायाचा वापर करून अर्ज भरावा. आधार कार्ड नसेल तर त्याऐवजी अशा विदयार्थ्याने आधार नोंदणी आयडी स्लीप किंवा बँक खाते पासबुकच्या प्रथम पानाची फोटोसह असलेली छायांकित प्रत अपलोड करून अर्ज भरावा.

४. विदयार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी आधार क्रमांक त्यांच्या बँक खात्याशी संलग्न (Link) असणे आवश्यक आहे ज्यामुळे लाभार्थी विदयार्थ्यांस शिष्यवृत्ती रक्कम सुरळीतपणे जमा होण्यास मदत हाईल.

५. विदयार्थ्याचे बँक खाते चालू स्थितीत (Operative/ Active Mode) असणे आवश्यक आहे. जेणेकरून शिष्यवृत्ती रक्कमेचे वितरण अयशस्वी (Fail) होणार नाही.

६. विदयार्थ्याचे बँक खाते स्वतःच्या नावावर असणे आवश्यक आहे. जॉईंट खाते नसावे.

७. खाते क्रमांक व इतर बँक तपशील भरण्यात विदयार्थ्यांकडून चूक झाल्यामुळे शिष्यवृत्ती विलंबाने मिळाल्यास/ न मिळाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत विदयार्थ्यांची राहील.

८. ऑनलाईन अर्ज भरण्यापूर्वी विदयार्थ्यांनी उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (Standard Operating Procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनलाईन अर्ज भरावा.

९. ऑनलाईन अर्ज भरताना विचारण्यात आलेली माहिती पूर्णपणे भरून, ऑनलाईन अर्जाची प्रत आवश्यक त्या सर्व कागदपत्रांसह महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहिकरिता सादर करावी.

10/7/24

डॉ.अश्विनी प्रशांत वागकर
प्र.- प्राचार्य

I/C Principal
DSPM's K.V. Pendharkar College
Dombivli